वाचा :- १) जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन कायदा २०१६
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्रं. संकिण २०१७/प्र.क्र./आरोग्य ३ दिनांक :- ०४/०४/२०१९.
३) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांचे पत्र क्रं. MPCB/PSO/B-995 dt. 13/03/2019.

जा.क्र. मप्रनिमं/उप्राकाप/
उप प्रादेशिक कार्यालय,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, परभणी.
दिनांक :- / /२०

**आदेश :-**

विषय :- जैव वैदयकियकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अन्वये जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणेबाबत.

जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मधील नियम ११ नुसार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करणेस संदर्भ क्रं २ अन्वये शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली होती. राज्यस्तरीय सल्लागार समितीप्रमाणे जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणेबाबत मा. जिल्हाधिकारी यांना संदर्भ क्रं. ३ अन्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.

जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ अन्वये जिल्हास्तरीय सल्लागार समिती खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | समिती | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी, परभणी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य आधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | सदस्य |
| ४ | उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी | सदस्य |
| ५ | मुख्य आरोग्य आधिकारी, महानगरपालिका, परभणी | सदस्य |
| ६ | उप प्रादेशिक आधिकारी, म.प्र.नि.मंडळ, परभणी | सदस्य सचिव |
| ७ | इंडियन मेडीकल असोशिएशनचे प्रतिनिधी, परभणी | सदस्य |

**समितीचे कामकाज व कार्यकक्षा –**

१. सदर समिती जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अमंलबजावणी केली जात आहे किंवा नाही यावर देखरेख व संनियंत्रण करेल.
२. जिल्हास्तरावर जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम जिल्हास्तरीय सल्लागार समितीचे राहील.
३. सदर समितीची बैठक सहा महिन्यातुन एकदा घेणे आवश्यक राहील.
समितीची कार्यकक्षा व कार्ये जैव वैदयकिय कचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ नुसार रहातील.

**(दी.म.मुगळीकर,** भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, परभणी

प्रतिलिपी-माहितीस्तव सादर
१) जिल्हा शल्यचिकित्सक, परभणी
२) जिल्हा आरोग्य आधिकारी, जिल्हा परिषद, परभणी
३) उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी
४) मुख्य आरोग्य आधिकारी, महानगरपालिका, परभणी
५) उप प्रादेशिक आधिकारी, म.प्र.नि.मंडळ, परभणी
६) इंडियन मेडीकल असोशिएशनचे प्रतिनिधी, परभणी

**(दी.म.मुगळीकर,** भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, परभणी